# कला व वाणिज्य महाविद्यालय, वडूज

विद्यार्थ्यांचे नाव - जगदाळे शितल बबन.

रोल नं - 324

वर्ग B. Com III

विषयाचे नाव - व्यावसायिक पर्यावरण

प्राध्यापकाचे नाव - प्रा. खोत सि. एम.

सन - 2015 - 16

Scanned with CamScanner

* जागतिकीकरण म्हणजे काय? सांगून जागतिकीकरणाचे सहकारी चळवळीवरील परिणाम स्पष्ट करा

→ उदारीकरण, जागतिकीकरण, खाजगीकरण या तिन्ही घटकांना खुपच महत्त्व प्राप्त झाले आहे. 1991 मध्ये सरकारने नवीन आर्थिक धोरणाचा अवलंब केला. त्यामुळे भारतात मुक्त अर्थव्यवस्थेची प्रक्रिया सुरु आहे.

व्याख्या :-

“देशाच्या राजकीय सीमेबाहेर आर्थिक व्यवहारांचा विस्तार करणे म्हणजे जागतिकीकरण होय”

जागतिकीकरणाचे सहकारी चळवळीवरील परिणाम खालीलप्रमाणे

→ (1) व्यावसायिक स्पर्धेत वाढ
→ (2) भांडवली सामर्थ्य
→ (3) व्यवस्थापकीय कौशल्य
→ (4) बाजारपेठांवरील वर्चस्व
→ (5) उत्पादन खर्चाची समस्या
→ (6) व्यवसायवाढीवर मर्यादा
→ (7) गुणात्मक विकासाचा अभाव
→ (8) अनिष्ट प्रवृत्तीत वाढ

(1) व्यावसायिक स्पर्धेत वाढ :-

जागतिकीकरणामुळे अर्थव्यवस्था सर्व बंधनातून मुक्त होते. परदेशातील कंपन्या आधुनिक तंत्रज्ञान व प्रचंड भांडवलाच्या मदतीने विविध क्षेत्रात आपला व्यवसाय सुरु करतात त्यामुळे देशातील उद्योग व विदेशी उद्योग यांमध्ये स्पर्धा वाढत आहे. व्यावसायावरील सर्व बंधने शिथिल करून राजकीय सीमेबाहेर व्यावसाय करता येतो.

Date

② भांडवली सामर्थ्य :—
सरकारने विदेशी गुंतवणुकदारांसाठी अनेक सवलती जाहिर केल्या आहेत त्यामुळे विदेशातून मोठ्या प्रमाणावर भांडवलाची आयात सुरू आहे परंतु सहकारी संस्था असे प्रचंड भांडवल उभारू शकत नाही. त्यामुळे त्यांच्या अस्तित्वाला धोका निर्माण होत आहे.

③ व्यवस्थापकीय कौशल्य :—
प्रचंड भांडवल उच्च तंत्रज्ञान आणि आधुनिक व्यवस्थापन यांच्या जोरावर विदेशी कंपन्या यशस्वी झाल्या आहेत. परंतू सहकारी संस्थांमध्ये आधुनिक व्यवस्थापन नसल्यामुळे त्यांना व्यावसायीक तत्वांचा वापर करता येत नाही.

④ बाजारपेठांवरील वर्चस्व :—
बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या उत्पन्नात विविधता नसते तसेच त्या कंपन्या विविध बाजारपेठांमधुन आपल्या मालाची विक्री करतात त्यामुळे त्यांचे बाजारपेठांवर वर्चस्व निर्माण होते. परंतु सहकारी संस्था मात्र स्थानिक बाजारातच मालाची विक्री करतात. त्यामुळे त्यांना बाजारपेठांचा विस्तार करता येत नाही

⑤ उत्पादन खर्चाची समस्या :—
बहुराष्ट्रीय कंपन्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादन खर्च कमी ठेवतात. त्यामुळे त्यांना आपल्या वस्तुंच्या कीमती स्वस्त ठेवणे शक्य ~~असेल~~ असते परंतू भारतात मजूर हा घटक स्वस्त

Page No.
Date

असला तरी उत्पादन खर्च कमी करण्यात भारतीय उद्योगांना यश आलेले नाही.

⑥ व्यवसायवाढीवर मर्यादा :-

जागतिकीकरणाच्या विचार करता सहकारी बँका सोडल्यास सर्वच सहकारी संस्थांच्या व्यवसाय वाढीवर मर्यादा ~~पडतात~~: पडलेल्या आहेत कारण या संस्था उत्पादन खर्चात कपात करणे ग्राहकांना आपल्याकडे आकर्षित करणे.

⑦ गुणात्मक विकासाचा अभाव :-

भारतामध्ये सहकारी संस्थांच्या गुणात्मक विकासाकडे लक्ष दिलेले नाही. राजकीय परिस्थीतीत सरकारचे दुर्लक्ष झाल्यामुळे सहकारी संस्थांचा विकास झाला नाही. परिणामी मुक्त अर्थव्यवस्थेत सहकारी संस्थांमध्ये असणारे दोष ~~प्रक~~ प्रकर्षाने जाणवू लागले.

⑧ अनिष्ट प्रवृत्तीत वाढ :-

संपुर्ण जग ही एक बाजारपेठ बनल्याने उत्पादकाने बाजारपेठ मिळवण्यासाठी व विकसनशील देशाच्या बाजारपेठेमध्ये ~~व~~ विकसनशील देशाच्या ~~बा~~ स्थान मिळविण्यासाठी उद्योगांमध्ये स्पर्धा वाढत आहे. त्याचा परिणाम म्हणजे अनिष्ट व चुकीच्या व्यापारी प्रथांचा वापर वाढला आहे त्याचा परिणाम सहकारी संस्थांवर होत असून त्यांच्या बाजार पेठा कमी होत आहेत.

अशा प्रकारचे परिणाम ~~हे~~ जागतिकीकरणाचे सहकारी चळवळीवर झाल्याचे आढळून येते.

Scanned with CamScanner